## निशाणी क्र.८५ वरील आदेश

प्रस्तुतचा अर्ज वादी यांनी दिवाणी प्रक्रिया संहिताचे आदेश ६ नियम १७, आदेश १ नियम १० सह कलम १५१ अन्वये दाखल केला आहे.

०२. वादीचे असे कथन आहे की, वादीने दाव्याचे कामी प्रतिवादी क्र.६ ते १४ यांना सहहिस्सेदार असल्याने सामील केलेले आहे. परंतु, त्यांचेविरुध्द कोणतीही दाद मागितलेली नाही. या दाव्याचे कामी वादीने निशाणी क्र.३/४ वरील गट क्र.३०२ चा उतारा दाखल केला असून उताऱ्यावर फेरफार क्र.१९७८ प्रमाणे एकनाथ दादा देवकर व कमलाबाई दादा देवकर यांची नांवे मालक सदरी नमूद आहेत. परंतु, वादी यांनी निशाणी क्र.३/११ वर चंद्रकांत परशुराम देवकर यांचे नांवाचा खाते क्रमांक १५६ चा उतारा दाखल केलेला आहे. त्या खाते उताऱ्यात गट क्र.३०२ मध्ये चंद्रकांत परशुराम देवकर यांचे खात्यावर गट क्र.३०२ मधील ०हे.१०आर क्षेत्र दर्शविलेले आहे व निशाणी क्र.३/१२ येथील खाते क्रमांक ५२१ राजेंद्र परशुराम देवकर यांचे खात्यावर गट क्र.३०२ मधील ०हे.०९आर क्षेत्र दर्शविलेले आहे. त्यामुळे, वादीने दावा मिळकत गट क्र.३०२ क्षेत्र ०हे.२०आर असे नमूद करुन प्रतिवादी क्र.६ एकनाथ दादा देवकर व प्रतिवादी क्र.७ कमळाबाई दादा देवकर म्हणून पक्षकार केलेले आहेत. परंतु, फेरफार क्र.१९७८ नुसार रे.दि.मु. क्र.५१/१९८१ त्यावरुन झालेले नियमित दरखास्त क्र.६४/१९९५ अन्वये वाटप होऊन एकनाथ व कमळाबाई यांचे वाटपास गट क्र.३०२ संपूर्ण घातलेला दिसतो. त्यामुळे, गट क्र.३०२ ची दावा मिळकत दाव्यातून कमी करणेत यावी तसेच प्रतिवादी क्र.७ कमळाबाई दादा देवकर यांचे नांव सुध्दा दाव्यातून कमी करणेत यावे अशी दुरुस्तीची परवानगी मिळणेबाबत विनंती केली.

०३. प्रतिवादी क्र.२ यांनी प्रस्तुतचे अर्जाकामी निशाणी क्र.९७ वर त्यांचे म्हणणे दाखल केले व वादी यांचे अर्जातील सर्व मजकूर नाकारला. त्यांनी असेही कथन केले की, प्रस्तुतचा दावा वाटपाचा असलेने वादी यांनी प्रतिवादी क्र.६ व ७ यांना दाव्याचे कामी सामील केलेले आहे. तसेच प्रस्तुत दाव्यात गट क्र.३०२ ही सुध्दा दावा मिळकत म्हणून सामील केलेली आहे. निशाणी क्र.९२ ला एकनाथ देवकर यांचे वारस रेकॉर्डवर घेणेस अर्ज दिलेला आहे. वादीला प्रस्तुतची दुरुस्तीची मागणी मागता येत नाही. म्हणून प्रस्तूतचा अर्ज नामंजूर होणेची विनंती केली.

०४. अभिलेखाचे अवलोकन केले. वादी व प्रतिवादी क्र.२ चे विद्वान विधीज्ञ श्री.व्ही.जी. गोसावी व सौ.एस.एस. पवार यांचा युक्तीवाद ऐकला. प्रस्तुतचे प्रकरण हे

दावा मिळकतीचे सरस निरस मानाने वाटप होऊन मिळणेकरिता दाखल केलेले आहे. वादीने शपथेवर कथन केले आहे की, गट क्र.३०२ मध्ये चंद्रकांत परशुराम देवकर यांचे नांवावर ०हे.१०आर क्षेत्र व राजेंद्र परशुराम देवकर यांचे नांवावर ०हे.०९आर क्षेत्र खातेउतारे अ.क्र.१५६ व ५२१ प्रमाणे दर्शविलेले आहे व फेरफार क्र.१९७८ नुसार रे.दि.मु. क्र.५१/१९८१ व त्यावरुन रे.द.क्र.६४/१९९५ अन्वये वाटप होऊन एकनाथ दादा देवकर व कमळाबाई दादा देवकर यांचे वाटपास संपूर्ण गट क्र.३०२ ची मिळकत दिलेली आहे.

०५. इथे हे नमूद करणे गरजेचे आहे की, मा.उच्च न्यायालय, खंडपीठ गोवा–पणजी यांचेकडील ***Mohd. Rafeeque Shaikh Vs. Mohseen Shaikh & Ors.*** या न्यायनिर्णयातील निष्कर्षानुसार, "दाव्याचे कामी पक्षकार हा आवश्यक व योग्य नसेल तर त्यांना दाव्याचे कामी पक्षकार करणे गरजेचे नाही. तसेच वादीचे दाव्यात पक्षकार करणे किंवा न करणे या बाबी वादीचे जोखमेवर असतात."

०६. वरील न्यायनिवाड्याचे अवलोकन केले असता त्याचे निष्कर्षाप्रमाणे तसेच दाव्याचे स्वरुप पाहता, प्रस्तुत दाव्यात वादीचे प्रस्तुत अर्जाचे विनंतीप्रमाणे प्रतिवादी क्र.७ कमळाबाई दादा देवकर व दावा मिळकत गट क्र.३०२ हे कमी केले तर ते वादीचे जोखमेवर आहे. तसेच वादीचा प्रस्तुत अर्ज मंजूर केला तर प्रतिवादी क्र.२ चे काही नुकसान होणार नाही व दाव्याचे स्वरुपात बदल होणार नाही. त्यामुळे, वरील सर्व बाबींवरुन वादीचा प्रस्तुतचा अर्ज भूर्दंडासह मंजूर करणे न्यायोचित ठरते. सबब, मी पुढीलप्रमाणे आदेश करीत आहे;

## **आदेश**

१. वादीचा निशाणी क्र.८५ वरील अर्ज र.रु.३००/– हा प्रतिवादी क्र.२ ला देणेचे अटीवर मंजूर करणेत येत आहे.

२. वादीने मागणीप्रमाणे विहीत मुदतीत दुरुस्ती करावी व दुरुस्त प्रत अभिलेखावर दाखल करुन प्रतिवादी यांना देखील पुरविणेत यावी.

MOHAMMAD SHARIQUEUR RAHEMAN ATAUR RAHMAN
Digitally signed by MOHAMMAD SHARIQUEUR RAHEMAN ATAUR RAHMAN
Date: 2024.10.05 11:00:40 +0530

विटा. (मो.शारीक ए.यू. रहेमान)
दि.०३.१०.२०२४. सह दिवाणी न्यायाधीश क.स्तर, विटा,
ता.खानापूर, जि.सांगली.

**CERTIFICATE**

I affirm that the contents of this PDF file are same as per dictation of P.O.

| | | |
|---|---|---|
| Name of Stenographer | :- | S.V. Gaikwad, |
| Name of the Court | :- | M.S.A.U. Rahman,<br>Jt.Civil Judge Jr. Dn., & J.M.F.C.,<br>Vita. Tal:-Khanapur. |
| Date of decision | :- | 03/10/2024 |
| Order signed by P.O. on | :- | 03/10/2024 |
| Order uploaded on | :- | 05/10/2024. |